28 APR 2017 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा भारतीय शुगरसोबत सामंजस्य करार

## चर्चासत्रे, व्याख्याने आदींचे आयोजन : उद्योगातील विविध प्रवाहांचा वेध घेण्यात येणार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभागाच्या पुढाकाराने पुणे येथील भारतीय शुगर ही संस्था आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. सामंजस्य करारावर शिवाजी विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी, तर भारतीय शुगरच्या वतीने विक्रमसिंह शिंदे यांनी स्वाक्षरी केली. कराराच्या माध्यमातून साखर उद्योगाशी संबंधित विविध प्रशिक्षण कार्यशाळा, चर्चासत्रे, व्याख्याने, मार्गदर्शन शिबिरे आदींचे आयोजन करण्यात येणार आहे.

पश्चिम महाराष्ट्रासह देशातील साखर उद्योगासमोर अनेक आव्हाने उभी आहेत. त्यांचा ऊहापोह करून या उद्योगाला दिशा देण्याचे काम भारतीय शुगरसमवेत झालेल्या सामंजस्य कराराच्या माध्यमातून व्हावे, अशी अपेक्षा प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी आज येथे व्यक्त केली. पुढे ते म्हणाले, साखर उद्योग सध्या विविध अडचणींतून वाटचाल करीत आहे, हे खरे असले तरी या उद्योगातील व्यवस्थापन आणि गुंतलेल्या अर्थकारणाला योग्य दिशा दिल्यास या उद्योगाचे आणि त्याच्याशी संबंधित शेतकऱ्यांचेही भवितव्य उज्ज्वल आहे. त्यामुळे विद्यापीठ पातळीवर आंतरविद्याशाखीय सहकार्यातून या उद्योगात गुंतलेल्या विविध प्रवाहांचा वेध घेण्यात यावा.




**कोल्हापूर : विद्यापीठाचा पुण्याच्या भारतीय शुगर संस्थेशी सामंजस्य करार करताना डॉ. डी.टी. शिर्के, विक्रमसिंह शिंदे, डॉ. पी.एन. भोसले, डॉ. पी.डी. राऊत, डॉ. व्ही.बी. ककडे, डॉ. विलास नांदवडेकर, अजित चौगुले.**

संस्थापक अध्यक्ष विक्रमसिंह शिंदे म्हणाले, भारतीय शुगर संस्थेची १९७५ साली स्थापन झाली. ही संस्था साखर उद्योगास आवश्यक प्रशिक्षणार्थी उपक्रम राबविण्यात अग्रेसर असून भारतासह इतर पाच देशांमध्ये तिचे कार्यक्षेत्र विस्तारलेले आहे. सन २०१२-१३ पासूनच शिवाजी विद्यापीठाच्या सहकार्याने साखर उद्योगाविषयी चर्चासत्र व कार्यशाळा आयोजित करण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी दिली. अर्थशास्त्र अधिविभागाचे डॉ. विजय ककडे यांनी स्वागत, प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला.

यावेळी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, अधिष्ठाता डॉ. पी.डी. राऊत, डॉ. ए.एम. गुरव, रसायनशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. पी.एन. भोसले, डॉ. एम.एस. देशमुख, एस.टी. कोंबडे आदी उपस्थित होते.

2 8 APR 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# साखर उद्योगातील विविध प्रवाहांचा विद्यापीठ घेणार वेध

## 'भारतीय शुगर'समवेत करार : प्रशिक्षण, कार्यशाळांचे आयोजन

कोल्हापूर : आंतरविद्याशाखीय सहकार्यातून साखर उद्योगात गुंतलेल्या विविध प्रवाहांचा वेध आता शिवाजी विद्यापीठ घेणार आहे. यासाठी विद्यापीठाने 'भारतीय शुगर' या संस्थेसमवेत गुरुवारी सामंजस्य करार केला. या दोन्ही संस्थांनी सहकार्यवृद्धीच्या दृष्टीने हा करार केला.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, देशातील साखर उद्योगासमोर अनेक आव्हाने आहेत. त्यांचा ऊहापोह करून या उद्योगाला दिशा देण्याचे काम 'भारतीय शुगर'समवेत झालेल्या सामंजस्य कराराच्या माध्यमातून व्हावे. साखर उद्योग सध्या विविध अडचणींतून जात आहे, हे खरे असले त्यातील व्यवस्थापन आणि गुंतलेल्या अर्थकारणाला योग्य दिशा दिल्यास या उद्योगाचे आणि त्याच्याशी संबंधित शेतकऱ्यांचे भवितव्य उज्ज्वल आहे. भारतीय शुगर संस्थेविषयी संस्थापक-अध्यक्ष विक्रमसिंह शिंदे म्हणाले, सन १९७५पासून 'भारतीय शुगर' ही साखर उद्योगास आवश्यक प्रशिक्षणादी उपक्रम राबविण्यात अग्रेसर आहे. भारतासह पाच देशांमध्ये तिचे कार्यक्षेत्र विस्तारलेले आहे. यावेळी सामंजस्य करारावर विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी, तर भारतीय शुगरतर्फे विक्रमसिंह शिंदे यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

कार्यक्रमास वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. एम. गुरव, अर्थशास्त्र अधिविभागाचे डॉ. विजय ककडे, रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. पी. एन. भोसले, एम. एस. देशमुख, एस. टी. कोंबडे उपस्थित होते. (प्रतिनिधी)




शिवाजी विद्यापीठाचा सोमवारी भारतीय शुगर संस्थेशी सामंजस्य करार झाला. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, 'भारतीय शुगर'चे संस्थापक-अध्यक्ष विक्रमसिंह शिंदे, डॉ. पी. एन. भोसले, पी. डी. राऊत, व्ही. बी. ककडे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त अधिकारी अजित चौगुले उपस्थित होते.

**उपक्रमांचे वेळापत्रक तयार करा :** साखर उद्योगास योग्य दिशा दर्शविण्याचे काम साध्य व्हावे. त्यासाठी पुढील वर्षभरामध्ये राबवावयाच्या विविध उपक्रमांचे वेळापत्रक तयार करून कार्यवाही करावी, अशी सूचना प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. शिर्के यांनी यावेळी केली.

28 APR 2017 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नियतकालिक स्पर्धेत 'अमर', 'उमंग' प्रथम

## नियतकालिक स्पर्धेत महाविद्यालयांनी सहभागी व्हावे : प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या नियतकालिक स्पर्धेला चांगला प्रतिसाद मिळत आहे, तरीही जास्तीतजास्त महाविद्यालयांनी स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन प्रभारी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी केले.

'शिवाजी विद्यापीठ संल महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा २०१५-१६"चा पारितोषिक वितरण समारंभ व्यवस्थापन परिषद सभागृहात पार पडला. याप्रसंगी ते बोलत होते.

बिगर व्यावसायिक गटात सर्वसाधारण विजेता पुरस्कार देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्ट्स अँन्ड सायन्स कॉलेज, चिखली (ता. शिराळा, जि. सांगली) यांच्या 'अमर' (संपादक डॉ. प्रकाश दुकळे) या नियतकालिकाने, तर



जयसिंगपूर : डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना संचालक डॉ. व्ही. ए. रायकर व उमंग चे संपादक प्रा. योगेश धुळूगडे व अन्य

व्यावसायिक गटात सौ. सुशिला दानचंद घोडावत चॅरिटेबल ट्रस्टच्या संजय घोडावत ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, अतिग्रे (ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) यांच्या 'उमंग" (संपादक योगश धुळुगडे) या नियतकालिकाने प्रथम क्रमांक पटकाविला.

डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाच्या नियतकालिक स्पर्धेत ७३ बिगर व्यावसायिक व १५ व्यावसायिक अशी एकूण ८८ महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेत १२७ विद्यार्थी व १६४ विद्यार्थिनी अशा एकूण २९१ विद्यार्थ्यांची वैयक्तिक पारितोषिकांसाठी निवड करण्यात आली. सुमारे ८७ हजार ४९८ रुपयांचे बक्षिस स्वरूपात धनादेशाचे वितरण करण्यात आले. ही संख्या समाधानकारक असली तरी या स्पर्धेत जास्ती जास्त महाविद्यालयांनी सहभाग घेणे गरजेचे आहे.

बिगर व्यावसायिक गटात द्वितिय क्रमांक कोल्हापूर येथील विवेकानंद महाविद्यालयाच्या 'विवेक" (संपादक डॉ. डी. ए. देसाई) या नियतकालिकाने, तर तृतीय क्रमांक पाटण (जि. सातारा) येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या 'दौलत" (संपादक डॉ. बापूराव व्ही. जाधव) या नियतकालिकाने पटकाविला.

व्यावसायिक गटात आष्टा (ता. वाळवा, जि. सांगली) येथील अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजीच्या 'ज्ञानदा' (संपादक सचिन चव्हाण) या नियतकालिकाने द्वितिय क्रमांक; तर, जयसिंगपूरच्या डॉ. जे.जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या 'व्हर्व्ह" (संपादक प्रा. प्रशांत पाटील) या नियकालिकाने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

डॉ. शिर्के यांच्या हस्ते विजेत्या महाविद्यालयांचे प्राचार्य व संपादकांचा फिरते चषक व प्रशस्तीपत्रे प्रदान करून गौरव करण्यात आला.

स्वागत व प्रास्ताविक कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. वासंती रासम, डॉ. पी.डी. राऊत, डॉ. पी.एस. पाटील, डॉ. ए.एम. गुरव, प्राचार्य डॉ. एस.आर. पाटील, डॉ. हिंदुराव पाटील, डॉ. शिरीष पवार, डॉ. व्ही. ए. रायकर, डॉ. ए. के. गुप्ता यांच्यासह महाविद्यालयांतील शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.